# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.६८१/२०२२/अहमदनगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. वैभव अनुरथ कदम, रा. सोनाली किराणा स्टोअर्स, केडगांव देवी, केडगांव, ता.जि. अहमदनगर | सहाय्यक लेखापाल, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, हमाल भवन, २ रा मजला, मार्केटयार्ड, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर | सरकारी कामगार अधिकारी, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, हमाल भवन, २ रा मजला, मार्केटयार्ड, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर |

**सुनावणी दिनांक – ०७/०५/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २५/०१/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही. प्रथम अपील आदेश पारित केलेला नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १७/०८/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/०८/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : जानेवारी २००० ते १७/०८/२०२२

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**
आपल्या कार्यायातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेले गृहकर्ज ज्या निधितून देण्यात त्या निधीची तपशीलवार माहिती, गृहकर्ज देण्याबाबतचे झालेल्या ठरावांच्या सत्यप्रती, कर्ज देण्याबाबतचे शासन निर्णयांची सत्यप्रती व आपल्या वरिष्ठांच्या आदेशांची सत्यप्रत, कर्जप्रकरण मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, कर्ज प्रकरणासाठी लावलेले निकष व त्यांच्या सत्यप्रती मिळाव्या. कर्जवाटप झालेल्या एकूण रक्कम, त्यातील वसुल रक्कम, व थकीत रकमेची माहिती, एकूण रकेमेतुन मिळालेले व्याजाची एकुण रक्कम.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखापाल, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांनी दि.१४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व्यापक जनहिताशी संबंधित नसलेल्या वैयक्तीक स्वरुपाची माहिती असल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रकानुसार सदरची माहिती देता येत नाही. असे अपीलार्थी यांना कळविण्यात आले.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २०/०९/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२/०९/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसुन येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**
विद्यमान जन माहिती अधिकारी – जन माहिती अधिकारी यांनी दि.१४/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व्यापक जनहिताशी संबंधित नसलेल्या वैयक्तीक स्वरुपाची माहिती असल्याने देता येत नाही. असे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष –**
१) जन माहिती यांनी अपीलार्थी वस्तुस्थितीदर्शक उत्तर / माहिती पुरविली आहे तसेच अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मोघम स्वरुपाचा असल्याने माहिती अर्ज मोघम ठरतो.
२) अपीलार्थीनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) उपायुक्त कामगार, उपायुक्त कामगार यांचे कार्यालय, आय.टी.आय. सिग्नलजवळ, सातपुर, नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारित न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ दि.१२/१२/२००७ तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.
२) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. ६८१/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**प्रत :- माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी**
**उपायुक्त कामगार, आय.टी.आय. सिग्नलजवळ, सातपुर, नाशिक**

जावक क्र. ८८४ 0 3 FEB 2025